सदरहू गाळा आपणास अॅलॉट करण्यात व ताबा देण्यात येत असला तरी त्याचा वापर मुंबई महानगरपालिकेकडून ऑक्युपेशन प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय करता येणार नाही. आपणास शासनाच्या आणि प्राधिका-यांच्या मागणीप्रमाणे व संस्थेचे व्यवस्थापक समिती वेळोवेळी, ठरविल त्याप्रमाणे, भूईभाडे, महानगर पालिका कर, सेवा शुल्क, रिपेअर्स व मेंटेनन्स शुल्क, विज व पाणी शुल्क, विमा शुल्क, सिंकिंग फंड शुल्क इत्यादीच्या मासिक वर्गणीच्या रकमा नियमितपणे ठरवून दिलेल्या मुदतीत भराव्या लागतील.

ह्या पत्राद्वारे, त्यात नमूद केलेल्या गाळ्याचा आंतील भागच वापर करण्यास मुभा आहे. ह्याव्यतिरिक्त गाळ्याच्या बाहेरिल बाजूस वा मागील बाजूस कोणत्याही प्रकारची जागा, कोणत्याही करणास्तव, वापरता येणार नाही.

आपणास संबंधीत गाळा सोडून जावयाचे असल्यास सदरहू गाळा प्रथम ह्यासंस्थेस सरेंडर करावा लागेल.

संस्थेच्या उपविधिमधील कोणत्याही तरतूदींचा/तरतूदींचे, नियमांचे वा अटी व शर्तींचे उल्लंघन करण्याचे [जेकृत्य/जो कृत्ये] जे संस्थेच्या व्यवस्थापक समितीला गंभीर स्वरूपाचे/स्वरूपाची वाटतील की, त्यामुळे संस्थेच्या सभासद वर्गातून काढून टाकले जाण्यात व पर्यायाने गाळ्यामधून हकालपट्टी केले जाण्यास आपण पात्र राहाल.

वरळी सागर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग
सोसायटी लिमिटेड, मुंबई, करिता,

२१.५.१९९

चेअरमन.

ठिकाण:- मुंबई.
दिनांक:- 14 OCT 1990